# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik
सर्व्हे नं.648/ब 2, फा. प्लॉट नं. 311 पै., जैन मंदिररोड, राका कॉलनी,
नाशिक – 422 002 (दूरध्वनी : 0253-2959787) email : nmrda.nsk@gmail.com


## कार्यालयीन आदेश

विषय : विकास परवानगी व नियोजन विभागातील तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यभाराबाबत

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक कार्यालयातील विकास परवानगी व नियोजन विभागात कार्यरत तांत्रिक अधिकारी यांना खालीलप्रमाणे कार्यभार देण्यात येत आहे.

### विकास परवानगी व नियोजन विभाग

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | तालुका |
|---|---|---|
| १ | श्रीमती जयश्रीराणी बा. सुर्वे, महानगर नियोजनकार तथा सहसंचालक, (विकास परवानगी व नियोजन विभाग) | त्र्यंबकेश्वर, सिन्नर, निफाड |
| २ | श्री. दिपक वराडे, सहमहानगर नियोजनकार तथा उपसंचालक, (विकास परवानगी) | नाशिक, इगतपुरी, दिंडोरी |

१) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त होणारे सर्व प्रकारचे विकास परवानगी प्रस्ताव तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये तडजोड शुल्क आकारून नियामानुकुल करावयाचे सर्व प्रस्ताव हे संबधित सहमहानगर नियोजनकार / महानगर नियोजनकार यांचे मार्फत वरील अधिकार प्रदानतेनुसार महानगर आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावेत.

२) विकास परवानगी / भोगवटा प्रमाणपत्र, प्रकरणामध्ये महानगर आयुक्त यांनी प्रस्ताव मान्य केल्यानंतर, संबधित क्षेत्रातील उपमहानगर नियोजनकार यांनी महानगर आयुक्त यांचे वतीने प्रकरणे निर्गमित करावीत.

३) कार्यालयात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या विकास परवानगी प्रस्तावांमध्ये किंवा सादर नकाशांमध्ये लागू विकास नियंत्रण नियमावलीनुसार काही त्रुटी असल्यास, त्या त्रुटी अर्जदार याना संबधित उपमहानगर नियोजनकार यांनी त्वरीत कळवाव्यात.

४) संबंधित कार्यक्षेत्राचे सहायक महानियोजनकार हे जनमाहिती अधिकारी असतील, संबंधित उपमहानगर नियोजनकार हे प्रथम अपिलीय अधिकारी व सह महानगर नियोजनकार / महानगर नियोजनकार हे अधिकार क्षेत्रातील द्वितीय अपिलीय अधिकारी असतील व ते माहिती अधिकार अधिनियमानुसार कामकाज पार पाडतील.

(डॉ माणिक गुरसळ भा प्र से)
महानगर आयुक्त
नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नाशिक

जा.क्र.नामप्रविप्रा/कार्या/80/2025

दि.०४/०२/२०२५

प्रति :

१) महानगर नियोजनकार (विकास परवानगी व नियोजन विभाग)
२) सहमहानगर नियोजनकार (विकास परवानगी)
३) सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी

Created with cam scan